# नमस्काराच्या योग्य पद्धती



## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 卐 | आध्यात्मिक परिभाषेतील प्रस्तावना ! | ८ |
| 卐 | मनोगत | १० |
| १. | ‘नमस्कार’ या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ | १२ |
| २. | नमस्कार करण्याचे लाभ | १२ |
| ३. | देव व संत यांना नमस्कार करण्याच्या पद्धती | १४ |
| ४. | ज्येष्ठ आणि वयोवृद्ध यांच्या संदर्भातील नमस्काराच्या काही कृती | ३९ |
| ५. | पती आणि पत्नी यांनी नमस्कार करण्याच्या संदर्भातील काही कृती | ४२ |
| ६. | नमस्काराच्या काही अन्य कृती | ४८ |
| ७. | नमस्कार करतांना काय करावे व काय टाळावे ? | ५२ |
| ८. | कोणाला नमस्कार करू नये ? | ६० |
| ९. | नमस्कार करणाऱ्याला मोठ्यांनी आशीर्वाद देण्याची कृती आणि त्यामागील शास्त्र | ६६ |

# मनोगत

देवाचे दर्शन घेतांना किंवा ज्येष्ठ वा सन्माननीय व्यक्तीची भेट झाल्यावर आपले हात नकळत जोडले जातात. 'नमस्कार' म्हणजे हिंदुमनावर असलेला एक सात्त्विक संस्कार, समृद्ध हिंदु संस्कृतीचा वारसा जपणारी कृती. भक्तीभाव, प्रेम, आदर, लीनता यांसारख्या दैवीगुणांची अभिव्यक्ती करणारी आणि ईश्वरी शक्ती प्रदान करणारी एक सहजसुलभ धार्मिक कृती म्हणजे नमस्कार.

नमस्कारामागील अध्यात्मशास्त्राविषयी असलेल्या अज्ञानामुळे म्हणा किंवा पाश्चात्त्य संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाचा परिणाम म्हणा, आजकाल बऱ्याच जणांकडून हस्तांदोलनाची कृती होते, तसेच नमस्काराची कृती झाल्यास एक औपचारिकता म्हणून होते. या कृतीला श्रद्धेचे अधिष्ठान नसल्याने त्यांना या कृतीतून मिळणारा लाभ अल्प असतो. श्रद्धेसह कोणतीही धार्मिक कृती ही अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य होणेही आवश्यक असते; कारण अशा कृतीनेच परिपूर्ण फळ मिळते. या लघुग्रंथात नमस्काराच्या विविध पद्धती अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्यरीत्या कशा करायच्या,

卐 ——— 卐

हे सांगतांनाच त्यांमागील शास्त्रही सांगितले आहे.

नमस्कार करतांना कोणत्या गोष्टी टाळाव्यात, हेही या लघुग्रंथात सशास्त्र सांगितले आहे. तसेच कोणत्या व्यक्तींना नमस्कार करू नये, याविषयीही मार्गदर्शन केले आहे.

या लघुग्रंथात दिलेल्या नमस्काराच्या पद्धती सर्वांना आत्मसात होवोत आणि त्यांना भावी पिढीवरही ते संस्कार करण्याची सुबुद्धी होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

卐 ——— 卐

**टीप :** लघुग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.


**देवपूजेमागील शास्त्र सांगणारा सनातनचा ग्रंथ !**

**देवपूजेपूर्वीची सिद्धता (शास्त्रासह)**

- 卐 पूजास्थळाची शुद्धी का करावी ?
- 卐 पूजेला बसण्यासाठी कोणते आसन घ्यावे ?

